# रामाचा विलाप

रावणाने सीतेला ओढतच आपल्या रथात नेले. त्याचा रथ आकाशात उडाला. तिथे अरण्यात एक जटायू नावाचा वृद्ध गिधाड राहत होता. त्याने हे पहिले. तो सीतेच्या रक्षणासाठी धावला. आकाशातून जाणाऱ्या रावणावर त्याने हल्ला केला. परंतु रावणाने आपल्या तलवारीने जटायूवर वार केले. त्याचे पंख कापले. रक्तबंबाळ जटायू जमिनीवर पडला. रावणाचा रथ आता लंकेच्या दिशेने जाऊ लागला.

इकडे मारिच राक्षसाला मारून राम परत फिरला. तोच त्याला लक्ष्मण येताना दिसला. रामाने त्याला विचारले, "लक्ष्मणा, तू सीतेला एकटी सोडून इथे कसा आलास?"

तेव्हा लक्ष्मणाने रामाला सांगितले की सीतेच्या आज्ञेवरूनच तो आला होता. रामाच्या मनात शंका आली. ते दोघे त्वरेने पंचवटीत परतले. परंतु त्यांना सीता दिसेना. रामाने सीतेला हाका मारल्या. परंतु तिचे उत्तर येईना. सीता दिसत नसल्याने रामाला अनावर शोक झाला. तो वेड्यासारखा तिला शोधायला लागला. त्याने झाडांना विचारले. वेलींना विचारले. फुलांना, पक्ष्यांना विचारले. "माझी सीता कुठे गेली आहे? तुम्ही तिला पाहिले का?" पण रामाला कोणीच उत्तर दिले नाही. सारेच दुःखाने खचून गेले होते.

सीतेला शोधत असताना अचानक त्यांना रक्तबंबाळ झालेला जटायू दिसला. राम-लक्ष्मण त्याच्या जवळ गेले. जटायूने त्यांना सारी घटना सांगितली. "रावणाने सीतेचे अपहरण केले आहे. मी तिला सोडवायचा प्रयत्न केला. पण रावणाने माझे पंख कापून टाकले. सीतेला घेऊन तो दक्षिण दिशेला गेला आहे." इतके सांगून जटायूने प्राण सोडले.

राम आणि लक्ष्मण यांनी वृद्ध जटायूचा अंतिम संस्कार केला. त्यानंतर जटायूने सांगितल्याप्रमाणे ते दक्षिण दिशेला निघाले.

वाटेत अरण्यात एक कबंध नावाचा राक्षस होता. त्याला पाय नव्हते. फक्त लांबच लांब असे हात होते. त्यांनी तो आसपास आलेल्या प्राण्यांना पकडून खात असे. त्याने राम आणि लक्ष्मण यांना पकडले. त्यांना तो खाणार एवढ्यात त्यांनी आपल्या तलवारींनी त्याचे हात कापून टाकले – आणि एक चमत्कार झाला. कबंधाचा राक्षस देह गेला. आता तिथे एक दिव्य देह दिसू लागला. तो खरा एक देव होता. परंतु शाप मिळाल्याने तो राक्षस झाला होता. रामाच्या हातून मृत्यू आल्याने तो पुन्हा देव झाला. कबंधाने हात जोडून रामाचे आभार मानले. त्याने रामाला सांगितले की दक्षिण दिशेला पंपा नावाचे एक सरोवर आहे. तिथे तुला एक वानर भेटेल. तो तुला सीतेला शोधण्यासाठी मदत करेल.

Unrestricted



1. रामाच्या विलापाचे वर्णन करणारी पाच वाक्ये धड्यातून शोधून लिहा. (ही वाक्ये धड्यात सलग आहेत.)

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

_______________________________________________

2. आता "विलाप" याला समानार्थी आणखीन दोन शब्द लिहा:

_______________________________________________

3. जटायू कसा होता असे तुम्हाला वाटते आहे? जटायू बद्दल दोन वाक्ये लिहा.

_______________________________________________

_______________________________________________

शिक्षकांसाठी:

1. खालील विषयांवर वर्गात चर्चा करणे:
    - दिशा – पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण
    - "अंतिम संस्कार" म्हणजे काय? अंतिम संस्कार आणि आदर यांचा परस्पर सम्बन्ध कसा असतो?
2. भारताच्या नकाशात रामाचा मार्ग दाखवा: अयोध्या – मिथिला – अयोध्या – चित्रकूट - पंचवटी. त्यावर सरयू, गंगा आणि गोदावरी या नद्या दाखवा.